सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२६/200)
दिनांक :- 28 JUL 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/अभियांत्रिकी/फार्मसी
पदविका/पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती

**विषय:- रेस्टॉरंट / हॉटेल्स / केटरर्स/ फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांमध्ये चीज ॲनालॉगच्या वापर करून अन्न पदार्थ तयार करीत असल्यास त्याचा मेन्यूकार्ड वरती स्पष्ट उल्लेख करणेबाबत.**

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१६/संकीर्ण/भटकीजनावरे/२०२५- २६ /१३९, दिनांक २४/०७/२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये अन्न सुरक्षा व मानके (Labelling and Display) नियम, २०२० नुसार अन्न व्यवसायिकांनी अन्न विक्री करताना संबंधित पोषण माहिती व घटकांची माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यानुषंगाने राज्यातील पनीर व चीज ॲनालॉग उत्पादकांना त्यांच्या बिलामध्ये तसा स्वयंस्पष्ट उल्लेख करण्याबाबत तसेच राज्यातील सर्व रेस्टॉरंट/हॉटेल्स/केटरर्स/ फास्ट फूड विक्रते या आस्थापनांना दि. ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मेन्यूकार्ड / इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवरती चीज ॲनालॉग चा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्यानुसार सदर निर्देशांचे पालन केले जाणार नाही, त्यांच्याविरूध्द सह आयुक्त अन्न) अन्न व औषध प्रशासन विभाग यांना कठोर कारवाई करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, सदर बाबीची जनजागृतीद्वारे प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक असून ग्राहकांची दिशाभूल होऊ नये यासाठी सक्रिय भूमिका व सहकार्य अपेक्षित असल्याने, व्यापक जनजागृती करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

त्यानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले स्तरावर पनीर व चीज ॲनालॉग हे दोन स्वतंत्र अन्न पदार्थ असल्याबाबत, सार्वजनिक शाळा, महाविद्यालये, वेळोवेळी होणारे सार्वजनिक सभा / कार्यक्रम व इतर माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यात यावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी आपल्या स्तरावर शासन पत्राचे अवलोकन करुन त्यातील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत- :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरिता करण्याकरीता.

960

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल–desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १६/संकीर्ण/चीज ॲनालॉग/जनजागृती/२०२६-२७/१३८ दिनांक - २२ जुलै, २०२६

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

विषय :- रेस्टॉरंट/हॉटेल्स / केटरर्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांमध्ये चीज ॲनालॉगच्या वापर करून अन्न पदार्थ तयार करीत असल्यास त्याचा मेन्युकार्ड वरती स्पष्ट उल्लेख करणेबाबत.

संदर्भ :- अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेपत्र क्र. अजिमुंश/चीज अनालॉग/व्यापक जनजागृती/२०२६/६५९, दि.१२ जून, २०२६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये अन्न सुरक्षा व मानके (Labelling and Display) नियम, २०२० नुसार अन्न व्यवसायिकांनी अन्न विक्री करताना संबंधित पोषण माहिती व घटकांची माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यानुषंगाने राज्यातील पनीर व चीज ॲनालॉग उत्पादकांना त्यांच्या बिलामध्ये तसा स्वयंस्पष्ट उल्लेख करण्याबाबत तसेच राज्यातील सर्व रेस्टॉरंट/हॉटेल्स/केटरर्स/फास्ट फूड विक्रते या आस्थापनांना दि.३० एप्रिल,२०२६ पर्यंत मेन्युकार्ड/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवरती चीज ॲनालॉग चा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्यानुसार सदर निर्देशांचे पालन केले जाणार नाही, त्यांच्याविरूध्द सह आयुक्त अन्न) अन्न व औषध प्रशासन विभाग यांना कठोर कारवाई करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, सदर बाबीची जनजागृतीद्वारे प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक असून ग्राहकांची दिशाभूल होऊ नये यासाठी सक्रिय भूमिका व सहकार्य अपेक्षित असल्याने, व्यापक जनजागृती करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

त्यानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले स्तरावर पनीर व चीज ॲनालॉग हे दोन स्वतंत्र अन्न पदार्थ असल्याबाबत, सार्वजनिक शाळा, महाविद्यालये, वेळोवेळी होणारे सार्वजनिक सभा/कार्यक्रम व इतर माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यात यावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना शासन पत्राचे अवलोकन करावयास सांगून त्यातील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

(डॉ. धनपाल कांबळे)
सह संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई